अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. ७ मार्च २०२६ । वर्ष : २४ वे अंक : १५७ वा किंमत : ५ रुपये पाने ८

## कर्नाटकातील नदीत पोहताना सोलापूरच्या तरुणाचा मृत्यू

✔ सोलापूर/प्रतिनिधी

नदीत पोहत असताना सोलापुरातील तरुण बुडून मयत झाला. ही घटना शुक्रवारी चनेगाव (ता.इंडी जि. विजयपूर) येथे भीमा नदीचा पात्रात आज शुक्रवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली.

आकाश जगदीश कोळी (वय २४ रा. उत्कर्षनगर क्रमांक २ झोपडपट्टी, विजापूर रोड, सोलापूर) असे मयताचे नाव असून तो सोलापूर सिविल हॉस्पिटलमध्ये कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करत होता.

आकाश कोळी हा चनेगाव येथील भीमा नदीत पोहण्यासाठी गेला होता. त्यावेळी तो पाण्यात बुडून मयत झाला. घटनास्थळी स्थानिकांनी मदत केली. मात्र त्याला वाचवता आले नाही. त्याला पाण्याचा बाहेर काढून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.



आकाश कोळी

# ‘नो’ म्हैसूर, अहमदाबाद, दिल्ली ओन्ली सोलापूर !

# ‘पायलट’ होण्याचं स्वप्न सोलापुरातच होणार पूर्ण






✔ सोलापूर/प्रतिनिधी

**चॅलेंजिंग करिअर क्षेत्र निवडण्याची साहसी धमक अनेक तरुणांमध्ये दिसते. ‘पायलट’ होणं हे एक त्यापैकी धाडसी करिअर क्षेत्र. या करिअरचं शिक्षण घेण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील तरुणाईला म्हैसूर, अहमदाबाद, दिल्ली किंवा परदेशातील शहरांमध्ये आता जाण्याची गरज नाही. पायलट बनण्याचं त्याचं स्वप्न खुद्द आपल्या सोलापुरात पूर्ण होणार आहे. नाही ना विश्वास बसत? अहो, दैनिक ‘सुराज्य’ची तरुणाईसंबंधीची ही गुड न्यूज तर वाचा...मग बसेल विश्वास!**

एअरपोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडियानं देशातील सात शहरांमध्ये फ्लाइंग ट्रेनिंग सेंटर सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. केवळ निर्णयच, नाही घेतला तर यासंबंधीचं टेंडरदेखील काढण्यात आलं आहे. त्यामुळं आपल्या सोलापुरात ‘फ्लाइंग ट्रेनिंग सेंटर’ होणार ही बात केवळ ‘हवे’तील गप्पांप्रमाणं नाही होणार. या शहरातील होटगी रस्त्यावरच्या विमानतळ परिसरातच हे वैमानिकांच्या प्रशिक्षणाचं केंद्र सुरु होणार आहे, पटतेय ना खात्री? बसतोय विश्वास? यासंबंधीच्या गुड न्यूजची आणखी माहिती पुढं वाचा...

देशात कुशल वैमानिकांची निर्मिती वाढवून भारताला विमान वाहतूक क्षेत्रात आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्देशाने ‘एएआय’ म्हणजेच एअरपोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया यांनी महत्त्वपूर्ण पाऊल उचललं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ‘आत्मनिर्भर भारत’ या संकल्पनेला अनुसरून ‘एएआय’ ने देशातील काही प्रमुख विमानतळांवर फ्लाइंग ट्रेनिंग ऑर्गनायझेशन एफटीओ’ स्थापन करण्यासाठी कंपन्यांकडून ई-टेंडरद्वारे प्रस्ताव मागवले आहेत, त्यामध्ये सोलापूर विमानतळाचा समावेश आहे.

विशेषत्वे, ट्रेनिंग सुरु होणारी सोलापूर विमानतळासह केशोद, कडप्पा, हुबळी, तुतिकोरिन, किशनगढ आणि धोलेरा या सात विमानतळांची निवड करण्यात आली आहे. या विमानतळांवर फ्लाइंग ट्रेनिंग संस्थांची स्थापना होण्यातून देशात प्रशिक्षित पायलटांची संख्या वाढण्यास मोठी मदत होणार आहे. इच्छुक कंपन्यांना एअरपोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडियाच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करता येणार आहे.

### एएआय सुरु करणार फ्लाइंग ट्रेनिंग सेंटर

### सोलापूरच्या विकासाला मिळणार नवं परिमाण

या निर्णयामुळे सोलापूर विमानतळाच्या विकासाला नवे परिमाण मिळणार असून, सोलापूरच्या विद्यार्थ्यांचे पायलट होण्याचे स्वप्न’ लवकरच वास्तवात उतरू शकते, अशी आशा व्यक्त केली जात आहे. ह्या करिता सोलापूर विकास मंचने विमानसेवा सुरू झाल्यापासून केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडे सातत्याने पाठपुरावा ठेवला त्यादृष्टीनं हे सेंटर सोलापुरात सुरु होण्याच्या दृष्टीनं पहिलं आणि ठोस सकारात्मक पाऊल पडलं आहे, असं मंचचे सदस्य विजय कुंदन जाधव यांनी सांगितलं.



सोलापूरसाठी ऐतिहासिक संधी

### पायलट बनण्याचं स्वप्न गिरणगावतच होणार पूर्ण

सोलापूर विमानतळाची या यादीत झालेली निवड ही शहरासाठी अत्यंत महत्त्वाची आणि ऐतिहासिक संधी मानली जात आहे असल्याचे मत सोलापूर विकास मंचच्या वतीने व्यक्त करण्यात आले. फ्लाइंग ट्रेनिंग संस्था सुरू झाल्यानंतर सोलापूर आणि परिसरातील विद्यार्थ्यांना पायलट होण्यासाठी दूर शहरात किंवा परदेशात जाण्याची गरज भासणार नाही. स्थानिक स्तरावरच आधुनिक प्रशिक्षण उपलब्ध होणार असल्यामुळे अनेक तरुणांचे पायलट बनण्याचे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकते.

रोजगाराच्या वाढणार संधी

### तरुणांना लाखो रुपयांचा मिळणार घसघशीत पगार!

विमान प्रशिक्षण क्षेत्राला मोठी चालना या उपक्रमामुळे भारतातील विमान प्रशिक्षण व्यवस्थेला बळकटी मिळणार असून भविष्यातील पायलट तयार करण्यासाठी आवश्यक असलेली पायाभूत सुविधा विकसित होणार आहे. तसेच विमान वाहतूक क्षेत्रातील रोजगाराच्या संधीही वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




# ७.५ अश्वशक्ती कृषी पंपांच्या वीज बिल माफिसाठी २० हजार कोटींची तरतूद

### बळीराजा सुखावला

✔ मुंबई/प्रतिनिधी

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतीविषयक महत्वाच्या घोषणा केल्या आहेत. फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजनेची घोषणा केली, ज्याअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत कर्ज प्रलंबित असलेले शेतकरी २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीसाठी पात्र असतील.ज्या शेतकऱ्यांनी नियमितपण कर्जफेड केली आहे,त्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रूपयांचे बक्षिस देण्यात येईल,असे त्यांनी सांगितले. याशिवाय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, ७.५ अश्वशक्ती क्षमतेच्या पाण्याच्या पंपांसह शेतकऱ्यांना वीज बिल माफ करण्यासाठी सरकार २० हजार कोटी रुपये देईल.



दरम्यान, यंदाच्या अर्थसंकल्पातून अनेक नवीन योजनांची घोषणा केल्या आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी क्षेत्र मजबूत करण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना सुरू करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. याशिवाय शेतकऱ्यांना रसायनमुक्त शेती स्वीकारण्यास प्रोत्साहित करण्यासाठी महाराष्ट्र नैसर्गिक शेती मोहीम सुरू करणार असल्याचे सांगितले.

त्याचवेळी, मत्स्यव्यवसाय क्षेत्राला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री मत्स्य संपदा योजना जाहीर करून शेतकऱ्यांच्या सोयीसाठी मुख्यमंत्री बळीराजा खेत पागदंडी सडक योजना देखील राबविली जाणार आहे, ज्या अंतर्गत शेतात जाण्यासाठी मार्ग विकसित केले जातील.२०२६ अर्थसंकल्पीय भाषणात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की यंदाचा बजेट विकसित महाराष्ट्राचे प्रतिबिंब आहे. ‘‘म हाराष्ट्र देशाचे इंजिन आहे आणि देशाला पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्यात राज्य महत्वाची भूमिका बजावेल,’’ असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले.

#### योजनांचा थेट लाभ

महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राबाबत सरकारने ‘ॲग्री स्टॅक’ योजना जाहीर केली, ज्याअंतर्गत महाराष्ट्र शेतकरी ओळखपत्र प्रणाली तयार करणारे देशातील पहिले राज्य बनेल. याअंतर्गत शेतकऱ्यांची विशिष्ट ओळख पटवली जाईल, ज्यामुळे त्यांच्यापर्यंत योजनांचा थेट लाभ पोहोचेल. सरकारने म्हटले की आतापर्यंत अंदाजे १ कोटी शेतकऱ्यांसाठी ओळखपत्रे तयार करण्यात आली आहेत.

# भय्या चौकातील ब्रिजच्या कामाला पुन्हा खीळ

## गोंधळ वाढला; रेल्वेने डिझाईन परत पाठवले

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर शहरातील भैय्या चौक येथे उभारण्यात येत असलेल्या रेल्वे ओव्हरब्रिजच्या कामाला पुन्हा खीळ बसली आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून (NHI) सुरू असलेल्या या कामासाठी १४ डिसेंबर २०२५ रोजी १०३ वर्षे जुना रेल्वे ब्रिज पाडण्यात आला होता. मात्र जवळपास अडीच महिने उलटूनही रेल्वे विभाग आणि एनएचएआय यांच्यातील पत्रव्यवहार सुरूच असल्याने प्रत्यक्ष कामाला गती मिळालेली नाही.



२ मार्च रोजी एनएचएआयने रेल्वे ब्रिजच्या स्ट्रक्चर व सब-स्ट्रक्चरचा आराखडा आणि डिझाईन रेल्वे बोर्डाकडे मंजुरीसाठी पाठवले होते. परंतु रेल्वे बोर्डाच्या प्रिन्सिपल चीफ इंजिनियर कार्यालयाने ही फाईल मंजूर न करता पुन्हा परत पाठवली आहे. सोलापूर रेल्वे विभागीय कार्यालयाने याबाबत एनएचएआयला पत्र पाठवून, रेल्वे बोर्डाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ही फाईल ऑटोकॅड स्वरूपात पुन्हा मुख्यालयाकडे पाठवावी, असे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी मार्किंग करून ब्रिजच्या पिलर उभारणीचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र फाईल परत आल्यामुळे हे काम पुन्हा थांबले आहे. या प्रकरणात खासदार प्रणिती शिंदे तसेच पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी रेल्वे विभागाकडे पाठपुरावा केला असला तरी अद्याप तोडगा निघालेला नाही. जुना रेल्वे ब्रिज पाडल्यानंतर नागरिकांना पर्यायी रस्त्यांचा वापर करावा लागत असून वाहतुकीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे रेल्वे, एनएचएआय, महापालिका आणि पोलीस प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून कामाला गती देण्याची मागणी सोलापूरकरांकडून होत आहे.

#### नागरिकांना पर्यायी रस्त्यांचा वापर करताना होतोय मोठा त्रास


#### कामाला गती देण्याची मागणी

सोलापूर शहराचे **तापमान**

कमाल तपमान **३९.५**

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




गतवर्षीची कसर भरून काढणार का ?

कल्याण
140-56-123

मुंबई
230-59-360

5 7 0

# ‘कमळ’ फुलवण्यासाठी भाजपची सुसाट एक्सप्रेस

## सात तालुक्यांमध्ये ‘बीजेपी’ची, तर करमाळ्यात राष्ट्रवादीची नोंदणी | जिल्ह्यातील अनेक तालुक्यांचे अन्य पक्षातील नेते सत्ताधाऱ्यांसमवेत

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेसह पंचायत समित्यांमध्ये पहिल्यांदाच ऐतिहासिक विजय मिळवलेल्या आणि पक्ष विस्ताराची मुहुर्तमेढ रोवलेल्या भाजपनं या जिल्ह्यातील पंचायत समित्यांमध्ये सत्ता स्थापण्याच्या पार्श्वभूमीवर, सुसाट एक्स्प्रेस सोडली असून अकरापैकी सात तालुक्यांमध्ये गट नोंदणी केली असून तुलनेत अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसने केवळ करमाळा तालुक्यात गट नोंदणी केली आहे.



विशेषत्वे, सदस्यांना कायदेशीररित्या पक्षाकडं थांबवून ठेवण्याची रणनिती भाजपनं राखून तशी अंमलबजावणी केली आहे. त्यातच या जिल्ह्यातील अनेक नेतेमंडळींनी सत्ताधारी भाजपसोबत राहण्याच्या दृष्टीकोनातून या पक्षाच्या गटनोंदणीत सहभागी होणं पसंद केलं आहे.

भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोलापूर जिल्ह्यातील ११पंचायत समित्यांच्या सदस्यांची गटनोंदणी करण्यासाठी भाजपने पुढाकार घेतला आहे. अकरापैकी सात पंचायत समितीमध्ये भाजपने, तर एका पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने गटनोंदणी केली आहे. पंचायत समितीचे सभापती व उपसभापतींच्या निवडी १२ मार्च रोजी होत आहेत.

त्यापूर्वी गटनोंदणी करून आपल्या सदस्यांना कायदेशीररित्या बांधून घेतले जात आहे. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनहर्ता अधिनियम १९८६ आणि त्या खालील महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनहर्ता १९८७ या कायद्याचा आधार घेऊन गट नोंदणी केल्याचं जिल्हाध्यक्ष शिंदे म्हणाले.

#### पंचायत समित्यांमध्ये ‘अशी’ आहे सदस्य संख्या

भाजपचे पंढरपूरमध्ये ८, माळशिरस ६, दक्षिण सोलापूर ११, बार्शी १२, मोहोळ ७, करमाळ्यात ७ आणि अक्कलकोटला ८ पंचायत समिती सदस्य विजयी झाले आहेत. भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी गटनोंदणीचा प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावानुसार ही नोंदणी करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावानूसार करमाळा तालुका पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादीच्या गटनोंदणीचा प्रस्ताव दिला आहे. या प्रस्तावानुसार या गटांची नोंदणी करण्यात आलेली आहे.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत करमाळा तालुक्यात आमदार नारायण पाटील यांच्या करमाळा तालुका विकास आघाडीला, सांगोल्यात आमदार बाबासाहेब देशमुख यांच्या सांगोला तालुका विकास आघाडीला चांगले यश मिळाले आहे.

पंढरपूरमध्ये भगीरथ भालके यांच्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीचेही सदस्य विजयी झाले आहेत. या तिन्ही तालुक्यातील स्थानिक आघाड्यांनी मात्र गटनोंदणीबाबत अद्याप कोणतीही हालचाल केलेली दिसत नाही, त्यामुळे आघाडीच्या बहुतांश प्रमुख नेत्यांनी सत्तेसोबत राहण्याची भूमिका घेतल्याचे दिसत आहे.

#### निवडलेले गटनेते पदाचे शिलेदार

| | |
|---|---|
| पंढरपूर | निखील गोसावी |
| माळशिरस | दतात्रय शेळके |
| दक्षिण सोलापूर | बलवान गोतसुर्वे |
| बार्शी | भीमा गव्हाणे |
| अक्कलकोट | सागर कल्याणशेट्टी |
| करमाळा | सोनाली तकीक |
| मोहोळ | संजीव खिलारे |
| **राष्ट्रवादी काँग्रेस** | |
| करमाळा | दशरथ घाडगे |